


दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२७ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.२३ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# हुंडा घेतला तर लग्नाला जाऊ नका:सुप्रिया सुळेंचा थेट इशारा

## महाराष्ट्र हुंडामुक्त व्हावा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे

पुणे (वृत्तसंस्था)–मुलगी आत्महत्या करते आणि आपण अजूनही हुंड्याविषयी बोलतोय, हीच आपल्या समाजाची शोकांतिका आहे, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी हुंडा प्रथेवर ताशेरे ओढले. तर महाराष्ट्र हुंडामुक्त व्हावा यासाठी समाजाच्या सर्व स्तरावर प्रयत्न होणं आवश्यक आहे. पुण्यात एका सुशिक्षित कुटुंबातील मुलीने केवळ हुंड्याच्या दबावामुळे आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर त्या बोलत होत्या.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लग्न समारंभात जाताना हुंडा घेतला किंवा दिला आहे का, याचा विचार करावा. जर हुंडा घेतला असेल तर अशा लग्नात सहभागी होऊ नये. लग्नाच्या रुखवतात गाडी दिसली, तर ती कोणी दिली, कोणाच्या नावावर आहे, हे विचारणे गरजेचे आहे. अशा प्रकारे प्रश्न विचारले गेले तरच समाजात योग्य संदेश जाईल.सुळे यांनी जुलै महिन्यापासून पुढील एक वर्ष राज्यभर शाळा, कॉलेज आणि विविध संस्था यांच्यामार्फत हुंडाविरोधी जनजागृती मोहीम राबवण्याची घोषणा केली. या मोहिमेद्वारे तरुण–तरुणींसह पालकांमध्येही जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

### सामाजिक परिवर्तन झाले का?

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेतून महिलांना पैसे मिळाले, हे सकारात्मक आहे. मात्र त्यातून महिलांच्या आयुष्यात मोठा बदल झाला का, हे पाहणे गरजेचे आहे. लाडक्या बहीणींना २१०० रुपये कधी मिळतील, याबाबत निश्चितता नाही, असेही त्यांनी नमूद केले. जसे शेतकरी कर्जमाफीच्या वेळेस वेळ आली की देऊ असे सांगितले जाते, तसे इथेही घडते.

### महिलांना व्यवसाया साठी संधी द्यावी

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सरकारने महिलांना फक्त आर्थिक सहाय्य न देता, त्यांना व्यवसायासाठी संधी द्यायला हव्यात. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. इच्छाशक्ती आणि सामाजिक परिवर्तन ही संकल्पना फक्त निवडणुकीपुरती न राहता, ती कृतीत उतरली पाहिजे. पूर्वी सायबर क्राईम हा मुद्दा नव्हता, पण आज मोबाईलच्या वापरामुळे महिलांवरील गुन्हे वाढले आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत महिलांमध्ये जागरूकता वाढवणे गरजेचे आहे.



### मोबाईल स्वत:च्या हिंमतीवर घ्या

पुण्यात घडलेली आत्महत्येची घटना एका सुशिक्षित कुटुंबातली आहे. या घटनेबाबत बोलताना सुळे म्हणाल्या की, आजही काही कुटुंबांत सून माहेरी गेल्यावर गाडी, मोबाईल, इतर वस्तू घेऊन याव्यात यासाठी तिला दबाव टाकला जातो, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, मोबाईल हवा असेल तर स्वत:च्या पैशातून घ्या असे त्यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना शपथपत्रासाठी १०० च्या स्टॅम्पपेपरची मुभा देण्यात यावी; उपमुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन

वरोरा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळविताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले. ज्येष्ठ शिवसैनिक सुधाकर मिलमिले यांनी शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात मुंबई येथे सदर निवेदन सादर केले.

राज्य शासनाच्या योजनेनुसार शेतकऱ्यांना दरवर्षी शेतीसाठी शून्य टक्के व्याजदराने पीक कर्ज पुरवले जाते. परंतु अलीकडेच लागू करण्यात आलेल्या नव्या शासन निर्णयानुसार सामूहिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना शपथपत्र सादर करताना ५०० च्या स्टॅम्पपेपरचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. या निर्णयामुळे लघु व अल्पभूधारक शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असून अनेक



शेतकरी कर्जासाठी अर्ज करण्यास टाळाटाळ करत आहेत. या पार्श्वभूमीवर निवेदनात शासनाने सदर निर्णयात सुधारणा करून पूर्वीप्रमाणे १०० च्या स्टॅम्पपेपरवर शपथपत्र सादर करण्याची मुभा देण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज प्रक्रियेत सुलभता मिळेल आणि आर्थिक भार कमी होईल, असा निवेदनाचा मुख्य हेतू आहे. शेतकरीहिताच्या दृष्टीने या निर्णयावर पुनर्विचार करून शासनाने तत्काळ सकारात्मक भूमिका घेण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# पालखी सोहळ्यासाठी वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे युद्धपातळीवर प्रयत्न

शिरूर । प्रतिनिधी

दौंड तालुक्यात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी सर्वच यंत्रणा सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील वीजपुरवठा अखंड राहावा म्हणून महावितरणकडून युद्धपातळीवर दुरुस्ती व देखभाल सुरू आहे.

पाटस व वरवंड परिसरात जुने व कमजोर झालेले विद्युत उपकरणे बदलण्यात येत आहेत. त्यामुळे काही काळापुरता वीजपुरवठा खंडित ठेवण्याची आवश्यकता आहे. पालखी मार्गावरील वीजखांब, तारा व रोहित्रे तपासून तातडीने दुरुस्त्या करण्यात येत असून सैल तारा उंच करणे, नवीन खांब बसवणे आणि झाडांच्या फांद्या तोडून धोका टाळण्याचा कार्यक्रम राबविला जात आहे.



यामुळे पालखी सोहळ्यात वीजविषयक अडथळे येऊ नयेत म्हणून महावितरणने विशेष पथके तैनात केली आहेत. कार्यकारी अभियंता विकास आल्हाट, प्रभारी उपअभियंता अनिल चौगुले, शाखा अभियंता सचिन रासकर, ग्रामीण शाखा अभियंता अमित धोत्रे, काकासाहेब माळी, मनोहर शेळके, दीपक कडू व नाशिक सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी अहोरात्र काम करत आहेत.महावितरणने नागरिकांना कळविले आहे की या दुरुस्तीमुळे काही भागात थोड्यावेळापुरता वीजपुरवठा खंडित राहू शकतो, मात्र पालखी सोहळ्याचा नियोजनबद्ध पार पडण्यासाठी हे आवश्यक आहे. नागरिकांनी संयम ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.पालखी मार्गावर वीजसुरक्षा साध्य करून दीर्घकालीन दर्जेदार वीजसेवा देण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. एकूणच, पालखीचे स्वागत हे केवळ धार्मिकच नव्हे तर यंत्रणांच्या तयारीचेही प्रतीक ठरले आहे आणि महावितरण या कार्यात आपली भूमिका समर्थपणे निभावत आहे.

### दैनिक सह्याद्रीचा राखणदारच्या बातमीची दखल

# निलज गावाच्या रस्त्यासाठी आ.नारायण पाटलांचा पुढाकार

## जिल्हा सेसफंडातून मंजूर केले ५० लाख



सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यात रस्त्यांच्या प्रश्नाने अनेक गावांत नागरिक हैराण झाले असून या पार्श्वभूमीवर निलज गावाच्या रस्त्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. नुकत्याच दैनिक सह्याद्रीचा राखणदारमधून निलज गावाच्या रस्त्याची दुरवस्था समोर आली होती. या रस्त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडचणी येत असल्यासोबतच नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही भेडसावत आहे, असे वृत्त प्रसिद्ध झाले होते.याची दखल घेत गावकऱ्यांनी स्थानिक आमदार नारायण आबा पाटलांची भेट घेतली. त्यांच्या मागणीनुसार, पाटलांनी तत्काळ सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संवाद साधून निलज गावाच्या रस्त्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शाळेतील जाण्याचा मार्ग सुकर करण्यासाठी जिल्हा सेसफंडातून ५० लाख रुपयांच्या निधीची मागणी केली आहे.

हा रस्ता निलज ते गायकवाड वस्ती ते अजिनाथ शिंदे वस्ती असा सुमारे दोन किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्याचा फायदा परिसरातील सुमारे ३० ते ३५ वाड्यावस्त्यांना होणार आहे.याप्रसंगी माजी



दैनिक सह्याद्रीचा राखणदार

काय आमच्या पुढाऱ्यांचा थाट

चिमुकल्यांना मिळेना शाळेची वाट!

नेत्यांनो, उघडा डोळे बघा नीट–लेकुरं कशी करतात शाळेसाठी पायपीट!

सोलापूर जिल्ह्यातील शेवटच्या टोकावर वसलेला अकरावा तालुका म्हणजे करमाळा. हा तालुका मोजायला अकरावा असला तरी दुर्लक्षित राहिलेल्या ग्रामीण समस्या पाहता, तो विकासाच्या दृष्टीने 'साडेसाती'तच अडकलेला वाटतो. राजकीय दृष्टिकोनातून भक्कम असलेल्या या तालुक्याने अनेक नेत्यांना निवडून दिलं, अनेक कारभाऱ्यांना संधी दिली. मात्र एकही चेहरा, एकही हाक गावाच्या जीवनात ठोस बदल घडवू शकली नाही.देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षे उलटली, पण करमाळ्यातील अनेक गावे आजही रस्ता, पाणी, वीज आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी झगडत आहेत. आधुनिक युगात शाळा ही मुलभूत गरज मानली जाते. पण करमाळा तालुक्यातील निलज या गावातील मुलांसाठी 'शाळा' ही फक्त इमारत नसून ती एक संघर्षाची दिशा बनली आहे.

सोलापूर । प्रा. राजेश गायकवाड । उपसंपादक

पंचायत समिती सदस्य ॲड. राहुल सावंत, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम, निलज विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ गायकवाड, दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे उपसंपादक प्रा. राजेश गायकवाड, तात्यासाहेब लोखंडे, शिवाजी गायकवाड, खेमचंद नाळे, दिलीप घोलप, भारतबप्पा गायकवाड, हवीण गायकवाड, सोमनाथ नाळे, दादा भालेराव, संदीप गायकवाड, वैजिनाथ भोसडे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रिटेवाडी उपसा सिंचनास लवकरच मंत्रि मंडळाची मंजुरी–फडणवीसांचा शब्द

## करमाळ्यात हरितक्रांती घडवणाऱ्या प्रकल्पाला लवकरच मिळणार हिरवा कंदिल

### करमाळ्यात हरितक्रांतीचे स्वप्न साकार होणार

मंगेश चिवटे यांच्या या प्रयत्नांमुळे रिटेवाडी उपसा सिंचन प्रकल्पाच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीला लवकरच न्याय मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या महायुती सरकारमुळे करमाळ्यात लवकरच हरितक्रांती साकार होईल, असा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत.



सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसा सिंचन योजनेला लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाचे अधिकारी आणि करमाळ्याचे भूमिपुत्र मंगेश चिवटे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १ लाख रुपये देणगी सुपूर्द केली. या वेळी त्यांनी रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा सर्व्हे अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला.

रिटेवाडी उपसा सिंचन योजना करमाळ्यात हरितक्रांती घडवणारी आहे. या योजनेतून उजनी धरणातून जवळपास ३ टीएमसी पाणी कुकडी कॅनलमार्गे तालुक्यातील सुमारे २५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणले जाणार आहे. या प्रकल्पाचा पहिला टप्पा अंतिम अवस्थेत आहे तर संबंधित यंत्रणेला सर्व्हेसाठी ४७ लाख रुपये अदा करण्यात आले आहेत.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळातच या प्रकल्पाचा सर्व्हे करण्याचा आदेश जलसंपदा सचिव कपूर यांना देण्यात आला होता. या सर्व्हेनुसार प्रकल्पाचा अहवाल तयार करण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत समाविष्ट करून मंजुरी देण्याचे आश्वासन दिले आहे.

### दुर्मिळ आजाराच्या रुग्णांसाठी सहानुभूती पूर्ण निर्णयाची मागणी

मंगेश चिवटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दुर्मिळ एसएसपीई सारख्या आजारांवरील उपचारांसाठी सहानुभूतीपूर्वक राज्यस्तरावर धोरण राबविण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुग्णांना आधार मिळवून देण्यासाठी राज्याने विशेष निर्णय घ्यावा, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### सहाय्यता निधीतून देणगीची आदर्श परंपरा

चिवटे यांनी सांगितले की, मागील ८ वर्षांपासून आपल्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीत रक्कम अर्पण करण्याचा आदर्श कायम ठेवला आहे. ३० व्या वाढदिवसानिमित्त ३० हजार रुपये दिल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, मुलगी कु.मुक्ताई व वडील जेष्ठ पत्रकार नरसिंह चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्तदेखील या निधीत देणगी दिली आहे.

# उमरखेडमधील रेशन वितरणात सावळा गोंधळ: तीन महिन्याच्या रेशनचा अंगठा, दिले फक्त दोनच महिने!

## गोरगरीब जनतेच्या हक्काच्या धान्यावर डल्ला? पुरवठा निरीक्षकांच्या भूमिकेकडे लक्ष

**उमरखेड । प्रतिनिधी**

सरकारने नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी जून महिन्यातच जून, जुलै आणि ऑगस्ट अशा तीन महिन्यांचे रेशन वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्देश होता गोरगरीब जनतेला त्यांच्या हक्काचा हिस्सा वेळेवर मिळावा. मात्र उमरखेड तालुक्यात या महत्त्वाच्या निर्णयाचा सावळा गोंधळ होत असल्याचे उघडकीस आले आहे. तालुक्यातील लोहरा खुर्द येथील रेशन दुकानात तीन महिन्यांच्या रेशनवर नागरिकांचा अंगठा घेतला जात आहे, तर प्रत्यक्षात दोनच महिन्याचे धान्य वितरित केले जात आहे, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात विकास दिलीप विनायते यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी तहसीलदार उमरखेड यांना निवेदन सादर करून तातडीने चौकशी आणि कारवाई करण्याची मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांच्या या प्रश्नाने प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरच शंका निर्माण झाली आहे. लोहरा खुर्दचे नागरिक म्हणतात, दुकानदाराने दोनच महिन्याचे रेशन दिले आहे, तरी अंगठा तीन महिन्याचा घेत आहे. जाब विचारल्यावर उडवाउडवीचे उत्तरे दिली जात आहेत. या संदर्भात उमरखेडचे पुरवठा निरीक्षक अमोल महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे की, दोन महिन्याचेच रेशन देऊन तीन महिन्याचा अंगठा घेतल्याचा आरोप समोर आला आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. गोरगरीब जनतेने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी लक्ष घालून रेशन घोटाळ्याचा पर्दाफाश करावा, अशी मागणी केली आहे. त्वरित कार्यवाही न झाल्यास लोहरा खुर्द येथील ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. या वेळी विकास दिलीप विनायते यांच्यासह गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# श्री संत योगी चांगावटेश्वर दिंडीचा आज प्रस्थान सोहळा

**शिरूर । प्रतिनिधी**

बाभुळसर बुद्रुक (म्हसोबावाडी) येथून श्री संत योगी चांगावटेश्वर दिंडी सोहळा सोमवारी, दिनांक २३ जून २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने प्रस्थान करणार आहे. या दिंडीला श्री संत चांगडेश्वर पालखी सोहळ्यात रथामागे ४० पैकी १३ वा क्रमांक प्राप्त झाला आहे.दिंडीचे मार्गदर्शन ह.भ.प. शशिकांत महाराज जगताप (गणेगाव दुमाला) हे मुख्य चोपदार म्हणून करणार असून दिंडीचे अध्यक्ष ह.भ.प. शहाजी महाराज नागवडे, तर ह.भ.प. रामदास विनायक नागवडे, गोपीचंद नागवडे आणि संजय आप्पा नागवडे यांच्या नेतृत्वाखाली सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



दिंडीच्यावेळी रामचंद्र बाजीराव नागवडे, बाळासाहेब अर्जुन नागवडे, भरत नारायण नागवडे, हनुमंतभाऊ पाटोळे, बाळासाहेब ढमढेरे, जयवंत नागवडे, संतोष नागवडे, माजी उपसरपंच राजेंद्र नागवडे आणि ह.भ.प. बापूराव गरुड यांच्या हस्ते पूजन करण्यात येणार आहे. तुळसी माता पूजन व हंडा पूजन सरपंच दीपाली नागवडे, माजी सरपंच शैलेजा नागवडे, कविता पाटोळे, मोनिका नागवडे, भारती नागवडे आणि योगिता गरुड यांच्या हस्ते पार पडेल.मृदुंग-टाळ पूजन दिलीप बापू नागवडे व भजनी मंडळाच्या हस्ते तर झेंडा पूजन गणेश मचाले, सचिन बापू मचाले, रामभाऊ शंकरराव नागवडे, दत्तात्रय काळे, बाळासो राऊत आणि अजय जगताप यांच्या हस्ते होईल. या दिंडीसाठी महेंद्र मोटेसर, संपतराव जगताप, कृष्णाजी नागवडे, कृष्णाजी थोरात, भाऊसाहेब थोरात, अनिल दिवेकर, मुरलीधर गवळी, जांबले मामा, मुकिंदा मचाले, दत्तात्रय नागवडे, महेश नागवडे, प्रशांत नागवडे, डॉ. पप्पू नागवडे, डॉ. सोमनाथ भगत, रावसाहेब नागवडे, संजय पाटील नागवडे, अंकुश आबा नागवडे, विजय आप्पा नागवडे, ज्ञानदेव शितोळे, बबन मामा टेकवडे, सुनील दादा नागवडे, नवनाथ गवळी, सुभाष नाना नागवडे, नवनाथ नागवडे, सगाजी नागवडे आणि भगवान चांदगुडे यांचे सहकार्य लाभणार आहे.दिंडी चालक ह.भ.प. शहाजी महाराज नागवडे यांनी समस्त ग्रामस्थांना या श्रद्धेच्या, भक्तीच्या आणि एकतेच्या प्रतीक असलेल्या दिंडीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# वैजापूरमधील अस्वच्छतेबाबत आवेज खान यांनी दिले उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर शहरात वाढत चाललेल्या अस्वच्छतेकडे लक्ष वेधत शिवसेना शाखाप्रमुख व युवासेना प्रसिद्धीप्रमुख आवेज खान यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. नगरपालिकेच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध व्यक्त करत त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.खान यांनी निवेदनात म्हटले आहे की, शहरातील बहुतांश प्रभागांमध्ये नाल्यांची साफसफाई अनेक दिवसांपासून झाली नसून, कचऱ्याने तुडुंब भरलेल्या नाल्यांतून दुर्गंधी पसरत आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, कचरा व्यवस्थापनाची परिस्थिती चिंताजनक आहे. रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग साचून राहतात, ज्यामुळे रोगराईचा धोका वाढला आहे.



याशिवाय, सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली असून नियमित सफाईचा अभाव आहे. याचा त्रास विशेषत: महिला, वृद्ध आणि बालकांना सहन करावा लागत आहे. रस्त्यांवरील विद्युत व्यवस्थाही बेभरवशाची आहे. प्रमुख रस्त्यांवरील दिवे अनेकदा बंद राहतात, तर खराब झालेले पोल व बल्ब त्वरित दुरुस्त केले जात नाहीत. या परिस्थितीत रात्री नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.

आवेज खान यांनी यापूर्वीही नगरपालिका प्रशासनाकडे या समस्यांविषयी लक्ष वेधले होते. मात्र, मुख्याधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा खान यांनी दिला आहे.दरम्यान, नागरिकांनी या मागण्यांना पाठिंबा दर्शवला असून प्रशासनाच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे उत्साहात साजरा झाला योग दिन

## विद्यार्थ्यांचा 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक संतोष पोतदार यांनी योग दिनाचे महत्त्व समजावून सांगत 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा शुभारंभ केला.विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, वृक्षासन, ताडासन, बैठे व्यायाम आणि ध्यानमुद्रा अशा विविध योगासने सादर करून आपली कला सादर केली. या उपक्रमात आर्यन नाळे, तपस्या नाळे, ओवी बंडगर, विश्वराज नाळे, विश्वजित नाळे, अंश



बागडी, समीक्षा नाळे, रुद्र देवकते, वीरेन नाळे, प्रज्ञा राजश्री येळे, आदिती येळे, रुद्र नाळे, सार्थक देवकते, स्नेहल नाळे, विद्या नाळे, राजवीर देवकते, राजवीर येळे, स्वरा नाळे, अक्षय येळे, आकांक्षा नाळे अशा विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.शिक्षिका अनुराधा शिंदे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा उद्देश समजावून दिला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरी किमान एक झाड लावून पर्यावरण रक्षणाचा संकल्प घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक संतोष पोतदार यांनी केले तर अनुराधा शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य शिवाजी नाळे, अध्यक्ष जालिंदर नाळे, योगेश नाळे, सुनील देवकते आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रत्येकाने आपल्या घरासमोर किमान एक झाड लावण्याचे आश्वासन दिले.

# भागवत एकादशी निमित्त विलासराव घुमरे सपत्नीक विठ्ठलदर्शनास उपस्थित

## पांडुरंगाच्या चरणी लीन होण्याचा घेतला आनंददायी क्षण

**करमाळा । प्रतिनिधी**

भागवत एकादशी निमित्त करमाळ्यातील यशवंत परिवाराचे आधारवड आणि विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी सपत्नीक श्री विठ्ठलाचे दर्शन घेत महापूजेला उपस्थिती लावली. त्यांच्या समवेत सुविद्य पत्नी जयश्री घुमरे यांनीही महापूजेमध्ये सहभागी होत पांडुरंगाचे आशीर्वाद घेतले.

विलासराव घुमरे हे करमाळा तालुक्यातील जनतेचे आशिर्वाद मिळवण्यासाठी कायमच प्रयत्नशील राहिले आहेत. भागवत एकादशी निमित्त घेतलेल्या या पांडुरंगाच्या दर्शनाचा आनंद अनेक अर्थांनी विशेष आहे. श्री विठ्ठलासह संत गजानन महाराजांच्या सेवेत रमणारी त्यांची वृत्ती नेहमीच वाखाण्याजोगी राहिली आहे.त्यांच्या या विठ्ठल भक्तीचा जागर श्रद्धाळूंच्या मनात कायम राहणार आहे, हे या पुण्यदिनी साकार झाले आहे.



# घुग्घुस येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

## 'योगाला जीवनशैलीचा भाग बनवा'-विवेक बोढे



**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस येथे भाजपा व पतंजली योग समितीच्यावतीने शनिवार, २१ जून रोजी प्रयास सभागृहात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साजरा होणारा ११ वा जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, योगाला आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवायला हवे. शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आणि तणावावर मात करण्यासाठी दररोज योगाचा अवलंब करणे आवश्यक आहे. योगामुळे मानसिक स्थैर्य प्राप्त होते आणि सकारात्मक विचारांना चालना मिळते.योग शिक्षक अनिल नित यांनी उपस्थितांना विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक दाखवून योगाभ्यास घेतला.

या कार्यक्रमास भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, पतंजली योग समितीचे अनिल नित, ज्येष्ठ समाजसेवक अनिल दागमवार सर, गुरुदेव सेवा मंडळाचे प्रेमलाल पारधी, प्रयास सखी मंचाच्या अध्यक्षा किरण बोढे, चिन्नाजी नलभोगा, कुसुम सातपुते, हेमंत पाझारे, अनघा नित, सुरेंद्र जोगी, बबनराव बोढे, विना बांगडे, विना घोरपडे, डॉ. वर्हाटे, मुस्तफा शेख, वंदना मुळेवार, सुशील डांगे, सिनू कोत्तूर, मॉर्निंग ग्रुप, फ्रेंड्स ग्रुप, महिला पतंजली योग समिती, प्रयास योग समिती, शिक्षकवृंद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्णसेवेसाठी प्रत्येकाने पुढे यावे-मंगेश चिवटे

# चंद्रपूरमध्ये युवासेनातर्फे वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचा सत्कार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या आदेशानुसार चंद्रपूर येथे युवासेनाच्या वतीने शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांचा शासकीय विश्रामगृह येथे सत्कार करण्यात आला. रुग्णसेवेचा ध्यास घेत चिवटे विदर्भातील वैद्यकीय मदत कक्षांना मार्गदर्शन करत आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. मंगेश चिवटे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने पुढाकार घ्यावा. आपण दररोज किमान एक रुग्णास मदत केली पाहिजे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब ज्या संवेदनशीलतेने जनतेच्या सेवेसाठी काम करतात, त्या प्रमाणे आपणही काम करावे.

चिवटे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देताना त्यांच्या नातेवाईकांनाही दिलासा मिळावा यासाठी वैद्यकीय मदत कक्ष कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू आहे.या कार्यक्रमास युवासेनेचे कार्यकारिणी सदस्य हर्षल शिंदे, शिवसेनेचे नवनियुक्त जिल्हाप्रमुख युवराज धानोरकर, युवासेनेचे जिल्हाप्रमुख शैलेश केलझलकर, आलेख रट्टे यांच्यासह अनेक शिवसेना-युवासेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# गुरुभक्त माधवराव येसेकर यांचे निधन

## नेत्रदानाच्या अंतिम इच्छेने दिला प्रेरणादायी आदर्श

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



महादेव मंदिर, राधाकृष्ण चौक, बाबुपेठ, चंद्रपूर येथील रहिवासी, सेवानिवृत्त शिक्षक आणि गुरुदेव सेवा मंडळाचे क्रियाशील गुरुभक्त माधवराव येसेकर यांचे गुरुवार दिनांक १९ जून २०२५ रोजी दुपारी वृद्धापकाळाने वयाच्या ८६व्या वर्षी दु:खद निधन झाले.

माधव राव येसेकर यांनी व्यक्त केलेल्या मरणोत्तर नेत्रदानाच्या इच्छेनुसार त्यांच्या कुटुंबीयांनी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अखिल भारतीय अनिस) जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप अडकिने यांना कळवले. त्यानंतर शासकीय नेत्रपेढीचे योगेंद्र इंदुरकर, माधुरी कुळसंगे आणि सागर मोरे यांनी त्यांच्या घरीच नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली.यावेळी जावई गजाननराव घुमे, मुलगी वनिता घुमे, कैलास धाबेकर, वर्षा धाबेकर, पत्नी सुनंदा येसेकर तसेच कुटुंबीय बालाजी, रवींद्र, मनोहर, संकेत, वेदुस्वामी, पंकज, अक्षय, उत्कर्ष आणि जय उपस्थित होते. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून घडवून आणलेले हे ३९वे मरणोत्तर नेत्रदान आहे.स्मृतीशेष माधवराव येसेकर यांच्यावर शुक्रवार दिनांक २० जून २०२५ रोजी दुपारी साडेअकरा वाजता बाबुपेठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# दररोज योग साधनेमुळेच जीवन रोगमुक्त, व्याधीमुक्त आणि नशामुक्त राहते-माजी खासदार रामदास तडस

## विदर्भ केसरी रामदास तडस क्रीडा अकादमीद्वारे देवळी येथे जागतिक योग दिन साजरा

**देवळी । प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त विदर्भ केसरी रामदास तडस क्रीडा अकादमी, देवळी आणि भारतीय जनता पार्टी देवळी शहर मंडळाच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ केसरी रामदासजी तडस इंडोअर स्टेडियम येथे मोठ्या उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी माजी खासदार रामदास तडस आणि आमदार राजेश बकाने यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभात दोन्ही मान्यवरांनी उपस्थितांना योग साधनेचे महत्त्व पटवून दिले.माजी खासदार रामदास तडस यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, योग साधनेला प्राचीन काळापासूनच समृद्ध इतिहास आहे. शरीर व मनाचा समतोल साधण्यासाठी, व्याधीमुक्त, रोगमुक्त आणि नशामुक्त जीवन जगण्यासाठी नियमित योग आवश्यक आहे. नियमित योगासने केल्यास शरीराची कार्यक्षमता वाढते, मानसिक समाधान लाभते, वजनाचा समतोल साधता येतो आणि शरीर व मनावर पूर्ण नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे प्रत्येकाने दररोज योगाचा समावेश आपल्या जीवनात करायला हवा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते होते. या वेळी माजी नगराध्यक्षा शोभा तडस, सुचिता मडावी, भाजपचे उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र मदानकर, नंदू वैद्य, राहुल चोपडा, डॉ. शेषराव बावणकर, सुरेश श्रीरंगवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पूरक व्यायामासह विविध आसने, सामूहिक योग, सूर्यनमस्कार, बाह्य प्राणायाम इत्यादींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. योग्य प्रशिक्षक दामोधर राऊत, महिला पतंजली पूर्वप्रभारी प्रणीता गुल्हाने, अनिल क्षीरसागर (पतंजली, हरिद्वार) यांनी साधकांना मार्गदर्शन केले. श्रीहरी प्रशांत तिमाने आणि महालक्ष्मी प्रशांत तिमाने यांनी सादर केलेल्या अवघड योगासनांच्या प्रात्यक्षिकाने उपस्थितांची दाद मिळवली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहराध्यक्ष उमेश कामडी, रवी कारोटकर, विनोद भगत, संजय मुजबैले, योगेश आदमने, अमोल काकडे, स्वप्निल बुट्टे, अंकित टेकाडे, मनोज बेंडे, शरद आदमने, प्रकाश कारोटकर, रमेश सातपुते, डॉ. श्रावण साखरकर, विद्या झिलपे, शुभांगी कुर्जेकर, विश्वजिता पोटदुखे, सारिका लाकडे, छाया तडस, मंगला मोकडे, माधुरी सखंडे, मनीषा लोखंडे, पूजा डंबारे, योगिता बुबन यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमास विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवाचा आनंद लुटला.



## इंदिरा गांधी व्यसनमुक्ती केंद्रात साजरा झाला योग दिवस



**वर्धा । प्रतिनिधी**

क्रांतिवीर स्व. महादेवराव ठाकरे सोशल असोसिएशन वर्धा संचलित इंदिरा गांधी व्यसनमुक्ती केंद्र येथे आज आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने केंद्राचे योग शिक्षक किरण देशमुख यांनी उपस्थितांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले आणि विविध योगासनांचे प्रात्यक्षिक दाखवले.या वेळी केंद्राचे प्रकल्प संचालक रमेश मोहदूरे, कर्मचारी सारिका देशपांडे, समुपदेशक रेश्मा बोभाटे, शीतल पुंड, अनिल उईके, सचिन हिवरे, जगदीश कुमरे, मारोती बोरसरे, रेखा कुमरे, सीमा सोनटक्के तसेच केंद्रातील रुग्ण उपस्थित होते. त्यांनी उत्साहाने योगासने करून कार्यक्रमात सहभाग घेतला.

## निरोगी व आनंदी जीवनाकरिता योग आवश्यक-संजीवनी माने

### सेवाग्राम येथे एनसीसी छात्र सैनिकांचा योगाभ्यास संपन्न

**सेवाग्राम । प्रतिनिधी**


आजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःचे आरोग्य निरोगी ठेवणे अतिशय गरजेचे आहे. तणावमुक्त जीवन जगण्यासाठी नियमित योगाचा अवलंब करायला हवा. निरोगी शरीरातच निरोगी मेंदू राहत असल्याने आनंदी जीवनाकरिता योगाभ्यास आवश्यक आहे,असे प्रतिपादन पतंजली योगपीठाच्या राज्याध्यक्ष संजीवनी माने यांनी केले. २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीतर्फे स्थानिक चरखा गृह परिसरात आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एनसीसीचे कमान अधिकारी कर्नल समीक घोष होते. यावेळी योग प्रशिक्षक संजीवनी माने, ज्योती शेटे, चंदा कुंभलवार, उषा काढव, संगीता इमले, सुभेदार मेजर दिलबाग सिंग आणि कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या प्रोटोकॉलनुसार यावेळी एनसीसीचे छात्र सैनिक, एनसीसीचे अधिकारी व लष्करी दलाचे प्रशिक्षक यांना योगाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सुभेदार विनोद कुमार, सुभेदार प्रमोद घोरपडे, कॅप्टन राहुल भालेकर, कॅप्टन प्रवीण ठाकरे, कॅप्टन नंदकिशोर बिजागरे, सेकंड ऑफिसर रवींद्र कुडूपले, लेफ्टनंट कांचन रामटेके, थर्ड ऑफिसर सिंधू कुशवाह, नायब सुभेदार नीरज सिंग, बटालियन हवालदार मेजर भीमराव जाधव, हवालदार संजय पटले, संतोष माने यांच्यासह लष्करी प्रशिक्षक उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले.




## जनता विद्यालय देवळी येथे उत्साहात साजरा झाला जागतिक योग दिन

**देवळी । प्रतिनिधी**

स्थानिक जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय देवळी येथे दिनांक २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य धर्मेश झाडे, उपमुख्याध्यापक सुरेंद्र उमाटे, पर्यवेक्षक भाऊराव जाधव, प्रमुख मार्गदर्शक पांडुरंग भालशंकर, सेवानिवृत्त शिक्षक भैय्याजी बोडखे आणि रमेश तेलरांधे उपस्थित होते. शालेय प्रांगणात सकाळी ठीक ६:३० वाजता योग शिबिरास सुरुवात झाली. योग प्रशिक्षक पांडुरंग भालशंकर यांनी सर्वप्रथम प्राणायामाचे महत्त्व समजावून सांगत विविध योगासनांचा सराव करून घेतला. प्रत्येक व्यायामाच्या वेळी त्याचे महत्त्व आणि आरोग्यास होणारे फायदे त्यांनी उपस्थितांना सविस्तरपणे सांगितले. योगाचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश कसा करावा आणि तो आपल्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी कसा आवश्यक आहे, हे त्यांनी मार्गदर्शनातून पटवून दिले. या वेळी बोडखे आणि तेलरांधे यांनीदेखील आपले मत व्यक्त करत योगाचा अर्थ, महत्त्व आणि आवश्यकता विशद केली. कार्यक्रमाचे संचालन मिलिंद भागवत यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक भाऊराव जाधव यांनी केले. योग दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी झाले.



## योगा ग्रुप गोपूरी परिवारातर्फे साजरा झाला अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन

**वर्धा । प्रतिनिधी**

२१ जून रोजी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन गोपूरी येथील योगा परिवाराच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी योगगुरू सुनील अवथनकर, अनिल चौव्हाण आणि डॉ. तळवेकर यांनी आपल्या शैलीतून उपस्थितांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विविध योगासने, सूर्यनमस्कार, शवासनाच्या योग्य पद्धतींचे धडे दिले, जे उपस्थित सदस्य तसेच गोपूरीत मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांनी उत्साहाने शिकले.कार्यक्रमास योगा ग्रुपचे अध्यक्ष पंकज नरेडी, उपाध्यक्ष अनिल चौव्हाण, अनिल पटेल, अशोक सराफ, अनिल गुल्हाणे, सारंग चोरे, राजाभाऊ ढोमणे, राजाभाऊ चवडे, लालचंद कृपलानी, राजेश यादव, महेश पोद्दार, राज कृपलानी, सुनील सुरदास, रवींद्र जानवे, रामकांत मस्की, विजय मोहता, वासुदेव तेलरांधे (सचिव), रवींद्र कडू, सतीश चिद्दरवार, भोपळे साहेब, सुनील उमरे, गजुभाऊ फुंडे, बंटीभाऊ गोसावी (माजी नगरसेवक), प्रमोद मिसाळ, फूलमाळी, अंधारेजी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



योग दिन साजरा करण्यात ग्रुपचे प्रवक्ते गिरीश भोवरे आणि संयोजक अनिल केला यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचा समारोप ग्रुपचे प्रोजेक्ट डायरेक्टर अंकुश पिंपरे यांच्या लयबद्ध विठ्ठल नामाच्या गजराने करण्यात आला. समारोपप्रसंगी उपस्थितांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## बजाज कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत मदनी येथे साजरा झाला जागतिक योग दिन



**वर्धा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (वर्धा) यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'ग्रामीण जागरूकता कार्यानुभव' कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत दिनांक २० मे २०२५ पासून मदनी (दिंदोडा) येथे विविध लोकसहभागी कार्यक्रमांना सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून दिनांक २१ जून २०२५ रोजी स्थानिक माध्यमिक शाळा मदनी (दिंदोडा) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक प्रार्थना आणि भक्तिगीताने झाली. त्यानंतर सूर्यनमस्कारासह गोमुखासन, भुजंगासन, धनुरासन, अर्धचक्रासन, मत्स्यासन अशा विविध आसनांची प्रात्यक्षिके घेण्यात आली. या वेळी दैनंदिन जीवनात योग व आसने समाविष्ट करण्याचे महत्त्व उपस्थितांना पटवून सांगण्यात आले.

कार्यक्रमास माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक बुंदे , सहायक शिक्षिका टेकाम , खोडके , मेघे ,शिक्षक बागडे, घोडे, शिक्षकेतर कर्मचारी पटोळे आणि देशमुख उपस्थित होते.बजाज कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्नेहल देशमुख, विषयतज्ज्ञ डॉ. राणी मोरे, कार्यक्रम समन्वयक राजेंद्र खर्चे, कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश घोडे आणि डॉ. कविता चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमास दिशा मिळाली. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी जान्हवी खडसे, रुची गायधने, गायत्री कोहपरे, प्रांजल कडुकर, तनस्वी नीळ या विशेषत: उपस्थित होत्या.कार्यक्रम सुरळीत पार पडला असून, भविष्यातही अशाच जोमाने विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार विद्यार्थिनींनी गावकऱ्यांना दिला.

## भारत विद्यालयात उत्साहात साजरा झाला जागतिक योग दिन

### विद्यार्थ्यांसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

स्थानिक भारत विद्यालय उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालय येथे दिनांक २१ जून रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलांशी बुरीले, पर्यवेक्षिका मनीषा कोंडावार, क्रीडाशिक्षक विनोद कोसुरकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक क्रीडाशिक्षक विनोद कोसुरकर यांनी केले. उपस्थित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना क्रीडाशिक्षक संदीप चांभारे यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून घेतले. या वेळी मुख्याध्यापक हरीश भट्टड यांनी योगाचा शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने कसा फायदा होतो, याबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, २१ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनाचा उद्देश म्हणजे योगाचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करणे आहे. प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याने निरोगी, सुदृढ आणि दीर्घायुष्यासाठी नियमित योगाचा अवलंब करायला हवा.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक किशोर चवरे यांनी केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय शास्त्र सेना (एनसीसी) विद्यार्थी-विद्यार्थिनी, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी झाले.




## सावंगी मेघे पोलिसांची अवैध दारूविक्रीविरुद्ध दमदार कारवाई

**वर्धा । प्रतिनिधी**

सावंगी मेघे परिसरात अवैधरीत्या देशी-विदेशी दारू विक्री करणाऱ्या तस्करांविरुद्ध पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दि. २१ जून रोजी रात्री ०८:०० वाजता पोलिस स्टेशन सावंगी मेघे येथील सहा जणांच्या विशेष पथकाने अंकुर सिडम या परिसरात छापा टाकून दारू विक्रेत्यांना रंगेहात पकडले.

पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे रॉयल स्टॅग, ऑफिसर चॉईस आणि हिरो प्लॅन्सर अशा नामांकित कंपन्यांच्या सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या कारवाईत अंदाजे १,१२,९०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींकडून रॉयल स्टॅगचे २ लिटर सीलबंद प्लास्टिक बाटल्या, ऑफिसर चॉईसचे १८० एमएल सीलबंद ४ बाटल्या, हिरो प्लॅन्सरचे सीलबंद ३२ ग्रेड बाटल्या, तसेच इतर दारूचे साधने जप्त करण्यात आली आहेत.पोलिसांनी अंकुर सिडम सह इतर दोन सहकाऱ्यांना ताब्यात घेत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींचे नेटवर्क शोधण्याचे काम सुरू आहे. पोलिस निरीक्षक संदीप कापडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सागर कवडे, उपनिरीक्षक प्रमोद मकरेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विशेष पथकाने ही कारवाई पार पाडली आहे. भविष्यात अशा अवैध दारूविक्रीविरुद्ध पोलिसांचा कटाक्ष कायम राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# तयार होणारी व्यायामशाळा शरीरसंपन्न, सशक्त युवक घडवणारी शिस्तबद्ध कार्यशाळा ठरणार-आ.जोरगेवार

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते बानिवाला व्यायामशाळेच्या कामाचे भूमिपूजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या जीवनात तरुणांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशा वेळी योग्य व्यायाम, योग्य मार्गदर्शन आणि प्रेरणादायी वातावरण मिळाले, तर तरुण कुठल्याही क्षेत्रात आपली छाप पाडू शकतात. आज आपण व्यायामशाळेच्या भूमिपूजनासाठी एकत्र आलो आहोत, ती केवळ एक इमारत नाही, तर ती चंद्रपूरच्या तरुणाईला घडवणारी एक शिस्तबद्ध कार्यशाळा ठरणार आहे. शरीरसंपन्न, सशक्त आणि स्वाभिमानी युवक घडविण्यासाठी ही व्यायामशाळा एक मजबूत मंच ठरेल, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.





आमदार किशोर जोरगेवार यांनी दादमहल वॉर्डातील बानिवाला व्यायामशाळेच्या बांधकामासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या कामाचे भूमिपूजन शनिवारी त्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य तुषार सोम, अजय वैरागडे, राशिद हुसेन, बशीर पठाण, श्याम धोपटे, किरणे ठाकरे, शेखर शेट्टी, नाहिद हुसेन, करणसिंह बैस आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर पुढे बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले की, आपण दरवर्षी माता महाकाली राज्यस्तरीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन करत आहोत. ही स्पर्धा केवळ चंद्रपूरच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. ही परंपरा पुढे चालवण्यासाठी आणि चंद्रपूरमधून नवे बॉडी बिल्डर घडवण्यासाठी सुसज्ज नवी व्यायामशाळा उभारणे आवश्यक आहे.

विकास फक्त रस्त्यांचा किंवा इमारतींचा नसतो. आपले युवक योग्य पद्धतीने घडले, त्यांना योग्य दिशा मिळाली, तर संपूर्ण समाज उभा राहतो. त्यामुळे या व्यायामशाळेचे काम हे केवळ शासकीय नसून एक सामाजिक संकल्प आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.आपण मागील काही वर्षांत चंद्रपूर मतदारसंघाचा सर्वसमावेशक विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. समाजभवने, अभ्यासिकांचे जाळे, व्यायामशाळा याकडे आपण विशेष लक्ष दिले आहे. यातून युवा पिढी घडणार असून समाजहिताचे कार्य हेच आमचे प्राधान्य असल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले.तयार होत असलेली बानिवाला व्यायामशाळा ही फक्त एक इमारत किंवा सरकारी योजना नाही. ती आपल्या परिसरातील तरुणाईच्या आत्मविश्वासाची आणि आरोग्याच्या जिद्दीची जागा ठरणार आहे. आज जी मुहूर्तमेढ रोवली जात आहे, ती उद्या आपल्या परिसरातील अनेक तरुणांना शरीरसंपन्न, कर्तबगार आणि देशसेवेसाठी सिद्ध होणाऱ्या शारीरिक व मानसिक बळाची प्रेरणा देणारी ठरेल, असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची आणि युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आरती कमलाकर डुकरे यांना 'मिसेस सुपर मॉम महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मान

**वरोरा । प्रतिनिधी**

नागपूर येथील सोनेरी पहाट बहुउद्देशीय संस्था द्वारे आयोजित 'सुपर मॉम अवॉर्ड २०२५' आणि 'किड्स फॅशन आयकॉन' या कार्यक्रमाचा शानदार समारंभ नागपूर येथील मंत्रा सेलिब्रेशन हॉलमध्ये पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेखा भोंगाडे होत्या, तर संचालक म्हणून सोनेरी पहाट बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




कार्यक्रमाचा शुभारंभ श्री गणेशाच्या दीपप्रज्वलनाने करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर डॉ. रितू चौधरी, अमृत इंगळे, रितू सिंग चव्हाण, शशांक पांडे आणि जबलपूर येथील चित्रपट दिग्दर्शक व अभिनेता विकास पांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते आरती कमलाकर डुकरे यांना 'मिसेस सुपर मॉम महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना क्राउन, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

आरती डुकरे या राष्ट्रीय स्तरावर आपली नृत्यकला सादर करून तालुक्यात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कलाकार आहेत. त्या सामाजिक कार्यात सक्रिय असून तालुक्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवून सहकार्य करतात. त्या एक कर्तबगार व्यावसायिक म्हणूनही आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतात.या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून रश्मी तिरपुडे, प्रार्थना मेश्राम, अनुरेता ढोलकिया, मीना बिसिन आणि शीतल बावणे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक समितीने विशेष परिश्रम घेतले.

आरती डुकरे यांनी आपल्या या यशाचे श्रेय आपल्या मुलगी आरोही डुकरे, मुलगा अधिराज डुकरे आणि पती कमलाकर डुकरे यांना दिले आहे.

# सेंट थॉमस इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये जागतिक योग दिवस साजरा

## आरोग्य हीच मानवी संपत्ती-मोहन मोहिते

**बोरगाव मेघे । प्रतिनिधी**

हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृतीत आपल्या ऋषी-मुनींनी आरोग्य उत्तम राहण्यासाठी योगाचा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून समावेश केला आहे. व्यक्तीचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी, रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी, लवचिकता टिकवण्यासाठी आणि सकारात्मक विचार वृद्धिंगत करण्यासाठी योगाचा उपयोग होतो. म्हणूनच देश अधिक बलशाली, सशक्त, निरोगी व सक्षम राहण्यासाठी योगाचा अवलंब आवश्यक आहे.आरोग्य हीच मानवी संपत्ती आहे,असे प्रतिपादन गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ समाजसेवक मोहन मोहिते यांनी केले.




ते बोरगाव (मेघे) येथील सत्येश्वर हॉलमध्ये सेंट थॉमस इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजद्वारे आयोजित जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते. या वेळी उद्घाटक म्हणून शाळेच्या प्राचार्या प्रीती सत्याम तर प्रमुख अतिथी म्हणून संचालक विजय सत्याम उपस्थित होते. या प्रसंगी योग शिक्षिका राजश्री होलगरे, अरुणा नागोसे, माधुरी महाजन, अर्चना राऊत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.प्रीती सत्याम यांनी आपल्या उद्घाटन भाषणात म्हटले की, भारत देश हा संत आणि ऋषी-मुनींची पवित्र भूमी आहे. शरीराची मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक सक्षमता साधण्यासाठी योग एक साधी आणि सहज साधना आहे. प्रत्येकाने आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी योगाचा अवलंब करायला हवा.या सातदिवसीय शिबिराचे संयोजन शाळेचे शिक्षक संदीप जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्रद्धा संत यांनी तर आभार प्रदर्शन रुची तिवारी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वेदांत सत्याम, संचाली भलमे, अश्विनी गुरणुले, रिजवाना शेख, इंद्रपाल जोगे, देवीदास लोखंडे, वंदना, शोभा कुकडे आणि लता देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

# तुळसकर इन्स्टिटयूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीत जागतिक योग दिन साजरा

## विद्यार्थ्यांनी घेतला योगाचा लाभ, प्रमुख पाहुणे म्हणून विजय धात्रक उपस्थित

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था संचालित तुळसकर इन्स्टिटयूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी,हिंगणघाट येथे २१ जून रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता संस्थेच्या प्रांगणात दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध योग प्रशिक्षक विजय धात्रक उपस्थित होते.कार्यक्रमात संस्थेचे प्राचार्य डॉ. राजविलास करमोरेंनी स्वागतपर भाषणात योगाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर विजय धात्रक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि कर्मचाऱ्यांनी या सत्रात उत्स्फूर्तपणे सहभागी होत आपली उपस्थिती नोंदवली.

योग सत्रानंतर विजय धात्रक यांनी योगाचा दैनंदिन जीवनातील उपयोग आणि महत्त्वावर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. श्रद्धा बोरकर यांनी उपस्थितांचे, विशेषतः प्रमुख पाहुण्यांचे आणि संयोजन समितीचे मनःपूर्वक आभार मानले.

हा कार्यक्रम संस्था सांस्कृतिक समिती व शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. योग फॉर हार्मनी अँड वेलनेस या संकल्पनेवर आधारित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढली तसेच तणावमुक्त जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली. या योग दिनाच्या आयोजनामुळे संस्थेमध्ये एकात्मतेचे आणि सकारात्मक वातावरणाचे दर्शन घडले.योग ही प्राचीन भारतीय परंपरा आजच्या तरुण पिढीसाठीदेखील किती प्रभावी आणि आवश्यक आहे, हे या कार्यक्रमाच्या माध्यमातून अधोरेखित झाले आहे. संस्थेच्यावतीने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या. अशा कार्यक्रमांच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग नृत्य परिवारच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

# एक पृथ्वी, एक स्वास्थ्य ही संकल्पना मानवी एकात्मता आणि सामूहिक आरोग्यजागृतीचे प्रतीक-आ.जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संपूर्ण जगात एकाच वेळी योग साधना केली जाते आणि त्यात चंद्रपूरसारखा आपला जिल्हा सुद्धा सहभागी होतो, हे आपल्या सर्वांसाठी गौरवाची बाब आहे. एक पृथ्वी, एक स्वास्थ्य या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम केवळ शरीरसंपन्नतेसाठी नाही, तर मानवी एकात्मता आणि सामूहिक आरोग्यजागृती याचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.योग नृत्य परिवार ट्रस्ट, चंद्रपूर मुख्यालयात ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एक पृथ्वी, एक स्वास्थ्य, वसुधैव कुटुंबकम् आणि फिटनेस स्वतःसाठी या संकल्पनांवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे, भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, योग नृत्य परिवारचे संस्थापक अध्यक्ष गोपाल मुंढडा, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य तुषार सोम, योग नृत्य परिवारचे जिल्हाध्यक्ष सुरेश घोडके, जिल्हा महिला प्रभारी किशोरी विरुडकर, प्रमोद बावीसकर, हरिदास नागपूरे, विजय घोनमोडे, सरिता बावीसकर, आकाश घोडमारे, दिलीप पूण्यपवार, जितू शरबरे, प्रशांत कत्तूलवार, जितेंद्र इजगीलवार, नरसु पोलसवार, आशिष झा, अशोक पडगीलवार आदींची उपस्थिती होती.



यानंतर पुढे बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले की, चंद्रपूरपासून विश्वाच्या दिशेने आरोग्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात सहभागी होऊन मी सर्व सहभागींच्या भावना जाणून घेतल्या. सर्वांनी योगासने करून आरोग्य सुदृढ ठेवण्याचा संकल्प केला.योग ही आपल्या भारताची प्राचीन परंपरा आहे. ही केवळ व्यायामपद्धती नाही, तर मन, शरीर आणि आत्मा यांच्यात संतुलन निर्माण करणारी एक संपूर्ण जीवनशैली आहे. आजच्या काळात, तणाव, अस्वस्थता आणि असमाधान यात जग व्यापून टाकत आहे, तेव्हा योग म्हणजे अंतःशांती आणि सुदृढ आरोग्याचा खरा मार्ग आहे.वसुधैव कुटुंबकम् ही आपल्या भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. आणि फिटनेस स्वतःसाठी ही संकल्पनाही अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घेतली पाहिजे. आपण स्वतः सुदृढ राहिलो, तरच आपले कुटुंब, समाज आणि देश सुदृढ राहतील.आज आपल्या चेहऱ्यावरील आनंद, एकाग्रता आणि आरोग्याबाबतचा जागरूक दृष्टिकोन मला प्रेरणा देऊन गेला.प्रत्येक वॉर्डातील योग गटाला आपण आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले आहे. तसेच पुढील टप्प्यात योगासाठी स्वतंत्र शेड उभारण्याचा आपला संकल्प आहे, असेही आमदार जोरगेवार यांनी यावेळी सांगितले.या कार्यक्रमाला योग साधकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .